K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.Com (code 243)

Subject:- Business Economics (Macro)

व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थूल)Sem IV

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

घटक :- Unit No 3 व्यापारचक्रे

उपघटक :- व्यापारचक्रे : अर्थ आणि व्याख्या, व्यापारचक्राची वैशिष्ट्ये, व्यापारचक्राच्या अवस्था, व्यापारचक्राचे नियंत्रण

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

Topic No 3

व्यापारचक्रे

TRADE CYCLE

3.1 व्यापारचक्रे : अर्थ आणि व्याख्या

(Trade Cycle : Meaning and Definition)

3.2 व्यापारचक्राची वैशिष्ट्ये (Characteristics of Trade Cycle)

3.3 व्यापारचक्राच्या अवस्था (Stages of Trade Cycle)

3.4 व्यापारचक्राचे नियंत्रण : चलनी साधने व राजकोषीय साधने

(Control of Trade Cycle : Monetary Measures and Fiscal Measures)

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रास्ताविक

व्यापारचक्राचे अस्तित्व हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. व्यापारचक्र ही संकल्पना खूप गुंतागुंतीची आहे. अर्थशास्त्रज्ञांना व्यापारचक्राची सर्वसमावेशक व्याख्या करण्यामध्ये आजपर्यंत यश आलेले नाही. उत्पादन, किमती आणि रोजगारपातळी आर्थिक क्रियांमधील आर्थिक चढ-उतारांशी व्यापारचक्र निगडित आहे.

3.1 व्यापारचक्रे: अर्थ आणि व्याख्या

TRADE CYCLES : MEANING AND DEFINITIONS

- **“संघटित अर्थव्यवस्थेच्या आर्थिक क्रियांमधील चढ-उतारांमधील व्यापारचक्र हा एक प्रकार आहे. 'व्यवसाय' हे विशेषण 'व्यापारचक्र' संकल्पना संघटित व्यापार तत्त्वावर चाललेल्या व्यवस्थेपुरतेच मर्यादित ठेवते तर 'चक्र' हा शब्द आर्थिक चढ-उतारांमध्ये एक विशिष्ट क्रम असतो हे सांगतो."**

  - डब्ल्यू. सी. मिचेल

प्रा. मिचेल चक्रीय बदलातील नियमिततेवर अधिक भर देतात.

- **"वाढणाऱ्या किमती आणि कमी झालेल्या बेरोजगारीचे प्रमाण अशी वैशिष्ट्ये असलेला चांगला व्यापाराचा कालखंड व घटणाऱ्या किमती आणि अधिक झालेले बेरोजगारीचे प्रमाण असा वाईट व्यापाराचा कालखंड यांची एकापाठोपाठ होणारी आवर्तने म्हणजे व्यापारचक्र होय.”** लॉर्ड केन्स

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

यावरून व्यापारचक्राची ऊर्जितावस्था आणि घसरण अवस्था मोजण्यासाठी केन्सने किमती व बेरोजगारी असे दोन निर्देशक सुचविले आहेत.

- **“एका सामान्य व्यापारचक्राच्या पुनरुज्जीवन, विस्तार अवस्था, अपसरण आणि संकोच अवस्था अशा एकमेकांशी निगडित प्रमुख चार अवस्था असतात. तेजीचे शिखर आणि मंदीची दरी असे दोन वळण बिंदू असतात.”**

  - बर्न्स आणि मिचेल

- **"व्यापारचक्राची विस्तार अवस्था किंवा तेजी अशी अवस्था असते की, जिच्यामध्ये उपभोगण्यात आलेले वास्तव उत्पन्न, उत्पादित करण्यात आलेले वास्तव उत्पन्न आणि रोजगारपातळी हे सर्व उच्च किंवा वाढणारे असते. बेकार कामगार आणि उपयोगात न आणलेली इतर संसाधने यांचे प्रमाण अत्यंत कमी असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर तेजीच्या अवस्थेत अर्थव्यवस्थेतील आर्थिक क्रिया या महत्तम पातळीला पोहोचलेल्या असतात. कोणत्याही प्रकारच्या संसाधनाचा अपव्यय होत नाही. किमतीच्या तुलनेने वेतनपातळी जरी मागे असली तरीदेखील वेतन आणि किंमतपातळी वाढलेल्या असतात. परंतु कालांतराने संसाधनाचा पूर्ण वापर होतो, ते दुर्मीळ होऊ लागतात. उत्पादनात वाढ करणे अवघड होते. उत्पादनातील अडथळे स्पष्ट दिसू लागतात. खर्चात वाढ होते. मालाचा पुरवठा करणे अवघड होते. या विविध बाबींमुळे पैशाच्या आकारमानवाढीला चालना मिळते. किंमतपातळीमध्ये झालेली वाढ ही सर्वत्र सारखी नसते. त्यामुळे किंमतरचना बिघडते. किंमतरचनेतील बिघाडामुळे विस्तार अवस्थेचा शेवट जवळ येऊ लागतो.**

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

घसरणीची अवस्था दृष्टिपथात येते आणि त्यामधून अर्थव्यवस्था मंदीच्या दरीकडे किंवा गर्तेकडे वाटचाल करते." - प्रा. हॅबर्लर

- **“विस्तार अवस्था आणि संकोच अवस्था यांची एकापाठोपाठ होणारी आवर्तने हे चक्रीय बदलाचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. त्यांना विशिष्ट लय नसते; परंतु ते पुनःपुन्हा आणि विशिष्ट पद्धतीने निर्माण होत असतात.” - प्रा. एस्टी**

- **'क्लेमन्टजगलर' हा व्यापारचक्राचा व्यवस्थितपणे अभ्यास करणारा पहिला अर्थशास्त्रज्ञ आहे. व्यापारचक्र सिद्धान्त विश्लेषणामध्ये हॅन्सेन, हॅरॉड, सॅम्युअल्सन, कॅल्डार, हिक्स, गुडविन, ड्युसेन बेरी यांसारख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांचे योगदान महत्त्वाचे आहे." - प्रा. शुम्पीटर**

व्यापारचक्राच्या बाबतीत एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे. तो म्हणजे कोणतेही व्यापारचक्र नियमित नसते. त्यांची तीव्रता आणि काळ हा देखील सारखा नसतो. प्रत्येक व्यापारचक्रामध्ये रोजगार आणि उत्पादनपातळीत होणारे बदल सारखेच नसतात. परंतु प्रत्येक अवस्थेत उत्पादन व रोजगारपातळीत होणारे बदल समान दिशेने होत असतात. म्हणून एकूण रोजगार, उत्पन्न, उत्पादन आणि किंमतपातळी यांच्यामध्ये पुनःपुन्हा होणारे बदल व्यापारचक्रांतर्गत येतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

3.2 व्यापारचक्राची वैशिष्ट्ये

CHARACTERISTICS OF TRADE CYCLE

(1) व्यापारचक्रांमधील बदल लाटांप्रमाणे असतात.

(2) दहा ते बारा वर्षांच्या नियमित अंतराने नवीन व्यापारचक्र निर्माण होत असते.

(3) व्यापारचक्र सर्वव्यापक असते. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांना ते व्यापून टाकते. (4) व्यापारचक्राच्या विस्तार अवस्था आणि संकोच अवस्था या संचित परिणामाने वाढत जातात.

(5) व्यापारचक्रांमधील बदल हे पुनरुद्भवी असतात.

(6) व्यापारचक्राचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असते. एका देशामध्ये निर्माण होणारे व्यापारचक्र आयात आणि निर्यातीमुळे एका देशामधून दुसऱ्या देशामध्ये संक्रमित होते.

(7) व्यापारचक्राचा टिकाऊ आणि भांडवली वस्तूंच्या उद्योगात उत्पादन व रोजगार पातळीवर उपभोग्य वस्तू उद्योगाच्या तुलनेने अधिक परिणाम होत असतो.

(8) व्यापारचक्राच्या काळात उत्पादन, रोजगार, किमती आणि उत्पन्न या सर्व आर्थिक व्यवहार पातळयांमध्ये एकाच दिशेने बदल होत असतो. म्हणजे विस्तार अवस्थेच्या

HRM BUS ECONOMICS SYBCOM

काळात या सर्वांमध्ये वाढ होते तर संकोच अवस्थेच्या काळात या सर्वांमध्ये घट होत असते.

(9) कारखानदारी उद्योगातील वस्तूंच्या किमतीच्या तुलनेने शेतीमालाच्या किमती अधिक लवचीक असतात. म्हणजे व्यापारचक्राचा शेतीमालाच्या किमतीवर अधिक परिणाम होतो तर कारखानदारी वस्तूंवर कमी परिणाम होतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कारखानदारी वस्तूंचा पुरवठा शेती-वस्तूंच्या तुलनेने उत्पादकाकडून अधिक प्रभावीपणे नियंत्रित केला जातो.

(10) इतर प्रकारच्या उत्पन्नाच्या तुलनेने नफ्याच्या स्वरूपात मिळणारे उत्पन्न अधिक बदलते असते. म्हणजे तेजीच्या काळात त्यामध्ये लक्षणीय वाढ होते तर मंदीमध्ये लक्षणीय घट होते.

(11) बहुतेक उद्योग एकमेकांशी निगडित असतात. त्यामुळे एका उद्योगात काही चढ-उतार होत असतील तर ते इतर उद्योगांमध्ये आपोआप संक्रमित होतात. त्यामुळे चक्रीय बदल सर्व उद्योगांवर परिणाम करतात.

(12) सर्व व्यापारचक्राचे स्वरूप सारखेच असले तरी त्यांच्यामधील चढ-उतार आणि त्यांचा कालावधी सारखा नसतो. म्हणून असे म्हटले जाते की, सर्व व्यापारचक्रे एकाच कुटुंबातील भावंडे असली तरी ती जुळी नसतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

3.3 व्यापारचक्राच्या अवस्था

STAGES OF TRADE CYCLE

प्रत्येक व्यापारचक्र चार अवस्थांमध्ये विभागले जाते :

(1) ऊर्जितावस्था किंवा पुनरुज्जीवन ((Revival or Recovery)

(2) तेजी किंवा विस्तार (Expansion or Prosperity)

(3) घसरण किंवा अपसरण (Recession)

(4) संकोच किंवा मंदी (Contraction and Depression)

वेगवेगळ्या व्यापारचक्राच्या बाबतीत या अवस्था पुनःपुन्हा निर्माण होणाऱ्या असतात आणि त्यांचा विशिष्ट क्रम असतो. परंतु प्रत्येक अवस्थेचा निश्चित कालावधी नसतो. प्रा. पिगू यांनी म्हटल्याप्रमाणे सर्वच व्यापारचक्रे एकाच कुटुंबामधील अपत्ये असतात; परंतु ती जुळी नसतात. सर्व व्यापारचक्रांची वैशिष्ट्ये एकाच पद्धतीने स्पष्ट करता येतात. जर आपण मंदीची दरी किंवा खालचा वळणबिंदू यापासून व्यापारचक्राच्या अवस्थांच्या वर्णनाला सुरुवात केली तर आपणास पुनरुज्जीवन, तेजी, घसरण आणि मंदी या क्रमाने व्यापारचक्राच्या अवस्थांचे वर्णन करावे लागेल.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

पुढील आकृती क्र. 3.1 मध्ये व्यापारचक्राच्या अवस्था दर्शविलेल्या आहेत.

EE रेषा समतोल व्यवहार पातळी दर्शविते.



कालखंड आकृती क्र. 3.1 : व्यापारचक्राच्या अवस्था

व्यापारचक्राच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये अर्थव्यवस्थेत काय-काय बदल घडतात, या अवस्थांची लक्षणे कोणती आहेत ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1. ऊर्जितावस्था किंवा पुनरुज्जीवन (Recovery or Revival) : अर्थव्यवस्थेत मंदी काही काळ टिकून राहिलेली होती आणि ऊर्जितावस्था किंवा पुनरुज्जीवन किंवा खालचा वळणबिंदू सुरू झाला आहे. येथून आपल्या विश्लेषणाला सुरुवात करत आहोत. ऊर्जितावस्थेला चालना देणाऱ्या प्रेरणा अंतर्गत किंवा बाह्य असू शकतात. उद्योगांमधील निम-टिकाऊ वस्तू वापरल्याने खराब होतात. अर्थव्यवस्थेत त्यांच्या ठिकाणी नवीन निम-

टिकाऊ वस्तू बसविण्याची गरज निर्माण होते. त्यामधून वाढीव मागणी निर्माण होते. ही वाढीव मागणी भागविण्यासाठी गुंतवणूक आणि रोजगारपातळीत वाढ होते. उद्योगांची पुनर्बांधणी होऊ लागते. संबंधित भांडवली वस्तूंच्या उद्योगात ऊर्जितावस्था सुरू होते. एकदा ऊर्जितावस्थेला सुरुवात झाली की ती स्वयंप्रेरणेने गतिमान होत जाते. परिणामतः रोजगारपातळी, उत्पन्नपातळी आणि उत्पादनपातळी यामध्ये सातत्याने वाढ होत जाते. ऊर्जितावस्थेच्या प्रारंभिक अवस्थेत अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादन क्षमता लक्षणीय असते; त्यामुळे उत्पादन खर्चात प्रमाणशीर वाढ न होतादेखील उत्पादनात वाढ होते. परंतु जसजसे ऊर्जितावस्थेचा काळ लोटला जातो तसतसे उत्पादन कमी लवचीक होते व उत्पादनात अडथळे दिसून येऊ लागतात. खर्चामध्ये वाढ होऊ लागते. मागणीनुसार मालाचा पुरवठा करणे अवघड होत जाते. त्यामुळे उद्योगसंस्थांचा विस्तार करणे गरजेचे होते. या परिस्थितीत किमतीमध्ये वाढ होते. त्यामुळे नफ्यामध्ये वाढ होते. व्यावसायिक अपेक्षांमध्ये सुधारणा होते. एकूण आर्थिक वातावरण आशादायी बनते. गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळते. त्यामुळे बँकांकडील कर्जाची मागणी वाढते. बँकांकडून पतविस्तार केला जातो. गुंतवणूक, रोजगार, उत्पादन, उत्पन्न आणि किमती यांमधील वाढ स्वयंप्रेरणेने वाढत जाते आणि त्यामधून ऊर्जितावस्था संपुष्टात येऊन अर्थव्यवस्था तेजीच्या अवस्थेत प्रवेश करते.

2. तेजी किंवा विस्तार (Expansion or Prosperity) : तेजीच्या अवस्थेत मागणी, उत्पादन, रोजगार व उत्पन्न या सर्व गोष्टी कमाल पातळीला पोहोचलेल्या असतात. त्या सर्व किंमतवाढीला चालना देतात. परंतु किमती आणि खर्चातील वाढ यांमधील अंतर जसे वाढत जाते त्यानुसार नफादेखील वाढत जातो. नफ्यामधील वाढ आणि भविष्यकाळात नफ्याबद्दलची उत्साहवर्धक स्थिती यामुळे भागबाजारातील भागांच्या किमती वाढतात.

उत्साहवर्धक वातावरणामुळे सर्व प्रकारच्या रोख्यांच्या किमतीत वाढ होते. त्यामधून बऱ्याचदा औद्योगिक प्रकल्पाच्या उत्पन्नाबद्दल अतिशयोक्तीपूर्ण चित्र रेखाटले जाते. अर्थव्यवस्था आशादायक वातावरणाच्या लाटेत सापडते. अधिक नफ्याच्या अपेक्षेने गुंतवणुकीत वाढ केली जाते. बँकादेखील सहजपणे कर्जपुरवठा करण्यास तयार असतात. या सर्व गुंतवणुकी प्रामुख्याने स्थिर भांडवल, कारखान्याची इमारत, यंत्रे आणि मशिनरी यांच्यामध्ये केली जाते. त्यामुळे आर्थिक क्रियांमध्ये लक्षणीय वाढ होऊन उपभोग्य वस्तूंची मागणी व त्यांच्या किमती यामध्ये वाढ होऊ लागते. किमतीमधील या वाढीमुळे किरकोळ विक्रते, घाऊक विक्रेते आणि उत्पादक या सर्वांना प्रेरणा मिळते. अशा त-हेने ही विस्ताराची प्रक्रिया संचित स्वरूपाची बनत जाऊन अर्थव्यवस्थेला व्यापारचक्राच्या शिखर अवस्थेला घेऊन जाते.

तेजीच्या शिखरावर अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारपातळी प्रस्थापित झालेली असते. परंतु तरीदेखील उत्पादनवाढीच्या प्रेरणा अधिक प्रबळ असल्याने उत्पादन घटकाच्या किमती वेगाने वाढतात. त्यामुळे किमतीची चलनविस्तारात्मक वाढ सुरू होते. ही तेजीची अवस्था संपण्याचे आणि घसरण किंवा अपसरण अवस्था सुरू होण्याचे लक्षण असते. घसरणीची बीजे तेजीच्या शिखरावरच रुजली जातात. एकूण आर्थिक रचनेवर तेजीच्या काळात ताण पडतो. तो ताणच विस्तारव्यवस्थेला ब्रेक लावतो. आर्थिक रचनेवर पडणारे प्रमुख ताण म्हणजे (1) श्रमिकांची टंचाई (2) कच्च्या मालाची दुर्मीळता यामुळे खर्च व किमतीमध्ये होणारी वाढ (3) भांडवलाच्या दुर्मीळतेमुळे व्याजदरात होणारी वाढ (4) वाढणाऱ्या किमती आणि उत्पन्न वाढूनदेखील स्थिर असणारी उपभोग प्रवृत्ती यामुळे उपभोगामध्ये होणारी घट.

वरील पहिल्या घटकामुळे नफ्याचा दर कमी होतो. दुसऱ्या घटकामुळे गुंतवणूक महाग होते. म्हणून पहिल्या व दुसऱ्या घटकांमुळे व्यावसायिक अपेक्षा क्षीण होतात. तिसऱ्या घटकामुळे मालाचे साठे वाढत जातात. त्यामुळे उद्योजक, व्यावसायिक आणि व्यापारीवर्ग अधिक दक्ष होतात. त्यामधूनच अवाजवी आशावादातून नैराश्याची परिस्थिती निर्माण होते. हा वरचा वळणबिंदू असतो किंवा अपसरण किंवा घसरणीची सुरुवात असते.

3. घसरण किंवा अपसरण (Recession) : तेजीच्या काळात विस्ताराच्या ज्या प्रेरणा असतात त्या क्षीण होऊ लागतात आणि अर्थव्यवस्था तेजीच्या शिखरावरून मार्गक्रमण करते आणि तेथेच अपसरणाची सुरुवात होते. तेजीच्या काळात बँकांनी दिलेली कर्जे वेळेवर परत मिळत नाहीत. बँकांची रोखता कमी होते, बँका अडचणीत येऊ लागतात. म्हणून व्यापारी बँका उद्योगांना कर्ज देण्याच्या बाबतीत अधिक दक्ष होतात. तसेच तेजीच्या काळात व्याजदर आणि उत्पादन-खर्च यांच्यामध्ये किमतीपेक्षा अधिक वाढ होते. नफ्याचा दर कमी होऊ लागतो. काही उद्योगसंस्था तोट्यात जातात त्या बंद पडतात तर काही उत्पादनात घट करतात आणि पूर्वीचे साठे विकण्याचा प्रयत्न करतात. गुंतवणूक, रोजगार, उत्पन्न व मागणी यांच्यामध्ये घट होते. ही सर्व प्रक्रिया संचित स्वरूप धारण करते. अपसरण मंद किंवा तीव्र स्वरूपाचे असते. परंतु थोड्याच अवधीत ते स्फोटक स्वरूप धारण करते आणि त्याचीच सुरुवात बँकव्यवस्था किंवा रोखेबाजार येथून सुरू होत असते. एकदा का आर्थिक धोक्याच्या भीतीची सूचना मिळाली की बँका आणि उद्योजक यांच्या मनातील आत्मविश्वास कमी होतो. बँका रोखतेची मागणी करतात. त्या कर्जाच्या बाबतीत अधिक दक्ष होतात. पूर्वी दिलेल्या कर्जाच्या परतफेडीची त्या मागणी करतात. एखादी

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

उद्योगसंस्था किंवा बँक किंवा एखादे महामंडळ आपल्या कर्जाच्या परतफेडीची असमर्थता जाहीर करते. त्यामुळे इतर बँका आणि उद्योगसंस्थाही अडचणीत सापडतात. ठेवीदार बँकांकडे ठेवीच्या मागणीसाठी धाव घेतात. त्यामुळे इतर बँका आणि उद्योगसंस्थाही अडचणीत सापडतात. ठेवीदार बँकांकडे ठेवीच्या मागणीसाठी धाव घेतात, त्यामुळे एकूण वित्तीय व्यवस्था कोलमडते. अमेरिकेत 1873, 1893, 1907 या वर्षी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती.

एम. डब्ल्यू. ली (M. W. Lee) यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, अपसरण किंवा घसरण एकदा सुरू झाले की ते वणव्याप्रमाणे स्वतःच वाढत जाते. स्वतःचा मार्ग किंवा स्वतःचा विस्तारण्याचा मार्ग ते स्वतःच निर्माण करत जाते आणि स्वतःकडे जी विनाशाची क्षमता आहे तिला ते स्वतःच बळ देण्याचे काम करते.

4. संकोच किंवा मंदी (Contraction and Depression) : अर्थव्यवस्थेत आर्थिक क्रियांमध्ये सार्वत्रिक घटीची परिस्थिती निर्माण झाली की अपसरणाचे रूपांतर मंदीमध्ये होते. वस्तू व सेवांच्या उत्पादनात, रोजगार, उत्पन्न, मागणी आणि किमती यांच्यामध्ये मंदीच्या काळात लक्षणीय घट होत असते. आर्थिक क्रियांच्या सार्वत्रिक घटीमुळे बँकांमधील ठेवीचे प्रमाण कमी होते. व्यावसायिक बँकांकडून कर्ज घेण्यासाठी उत्सुक नसल्याने बँकांची पतनिर्मितीची क्रिया थांबते. बँकदरामध्ये लक्षणीय घट होते. प्रा. एस्टी (Estey) यांच्या मते, खरेदीशक्तीमधील घट हे किमतीमधील घटीचे मूलभूत कारण आहे आणि तेच सर्वसाधारण उत्पादन घटक करण्यास जबाबदार असते. म्हणून सर्वसाधारण सार्वत्रिक बेकारी, किमती, नफा, वेतन, व्याजदर, उपभोग खर्च, गुंतवणूक, बँकठेवी आणि कर्जे

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

यांमधील घट ही मंदीची लक्षणे आहेत. कारखाने बंद पडतात. सर्व प्रकारच्या भांडवली वस्तू आणि इमारती यांचे उभारणीचे काम थांबते. या सर्व प्रक्रिया संचित स्वरूप धारण करतात व स्वतःच्या प्रेरणेने बळकट होत जातात; त्यामुळे अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत सापडते.

मंदी अर्थव्यवस्थेत अल्पकाळ टिकते आणि लक्षणीय कालावधीसाठी अर्थव्यवस्थेत टिकून राहू शकते. परंतु लवकरच मंदीच्या गतीला रोध निर्माण करणाऱ्या प्रेरणा अर्थव्यवस्थेत निर्माण होतात. अर्थव्यवस्थेत पुनरुज्जीवनाचा/ऊर्जितावस्थेचा मार्ग मोकळा होतो आणि एक व्यापारचक्र पूर्ण होते.

व्यापारचक्राचे सर्वसाधारण वर्तन ठरविणे अवघड असते; कारण अनेक प्रकारच्या पेरणा आणि घटक व्यापारचक्राच्या मागे असतात. व्यापारचक्र अर्थव्यवस्थेत कसे निर्माण होते आणि अर्थव्यवस्थेत कसकसे बदल होतील या बाबतीत अनेक सिद्धान्त मांडले गेले आहेत. काही अर्थशास्त्रज्ञ अंतर्गत घटकामुळे व्यापारचक्र निर्माण होते असे मानतात तर काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते बाह्य घटक व्यापारचक्राची निर्मिती करतात.

HRM BUS ECONOMICS SYBCOM

3.4 व्यापारचक्राचे नियंत्रण : चलनी साधने व राजकोषीय साधने

CONTROL OF TRADE CYCLE : MONETARY MEASURES AND FISCAL MEASURES

व्यापारचक्राच्या निर्मितीच्या कारणांच्या बाबतीत किंवा सिद्धान्त मांडण्यामध्ये अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. त्याचप्रमाणे व्यापारचक्राच्या नियंत्रणात कोणत्या साधनांचा वापर किंवा कोणते धोरण स्वीकारावे या बाबतीतदेखील मतैक्य नाही. व्यापारचक्रासारख्या गुंतागुंतीच्या घटनेच्या बाबतीत एखादी उपाययोजना करून उपयोग होणार नाही. बहुतेक अर्थशास्त्रज्ञ असे मानतात की, प्रचलित आर्थिक अवस्थेत आर्थिक चढ-उतार पूर्णपणे रोखले जाऊ शकत नाहीत. आपण फक्त त्यांना काही काळ थांबवू शकतो किंवा त्यांची तीव्रता काही प्रमाणात कमी करू शकतो.

अर्थव्यवस्थेत स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि सुधारणात्मक उपाय अशा दोन प्रकारच्या साधनांचा वापर करावा लागतो.

आर्थिक संकटाचा प्रतिबंध किंवा ते टाळण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर करावा लागेल हे अर्थव्यवस्थेच्या तपासणीवरून काढलेल्या निष्कर्षांवर अवलंबून असते. कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या हवामानविषयक घटकांचे आपण नियंत्रण करू शकत नाही. भारतासारख्या शेतीप्रधान देशात 65 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. तेथे शेतीचे पावसावरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी कालवे, विहिरी व तलाव या साधनांचे जाळे निर्माण करून शेतीला नियमित पाणीपुरवठा करून

शेतीमालाचा खात्रीशीर पुरवठा करता येईल, युद्ध, भूकंप व साथीचे रोग यांचा प्रतिबंध करणे शक्य नाही; असे असले तरी व्यापारचक्रावर त्यांचा फारसा प्रभाव पडत नाही. तसेच ते नियमितदेखील येत नाही.

मागणी आणि पुरवठ्याच्या समायोजनेतील त्रुटी, शेतीमाल, औद्योगिक वस्तू, रोजगार पातळी, आयात-निर्यात, दरडोई उत्पन्न व किमती यांसारख्या विविध घटकांची आकडेवारी गोळा करून कमी करता येऊ शकतात. त्यामुळे व्यावसायिक वस्तूंच्या मागणी-पुरवठ्याच्या बाबतीत पूर्वानुमान काढू शकतात. एखादी संशोधन संस्था व्यावसायिकांना वेळोवेळी मार्गदर्शन करू शकते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत निर्माण होऊ शकणारा आशावाद किंवा निराशावादाची परिस्थिती निर्माण होण्याअगोदरच तिचे नियंत्रण केले जाऊ शकते. वर वर्णन केल्याप्रमाणे व्यापारचक्राचे नियंत्रण होईलच असे नाही. त्यामुळे चलनविषयक धोरण, राजकोषीय उपाय आणि इतर साधने यांचा वापर करणे अनिवार्य ठरत असते.

चलनी साधने/धोरण

(Monetary Measures/Policy)

चलनविषयक धोरणाचा वापर प्रामुख्याने पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी केला जात होता. व्यापारचक्राचे कारण कोणतेही असले तरी चलनविषयक घटक व्यापारचक्र निर्माण करत नाही. परंतु एकदा का व्यापारचक्र निर्माण झाले की, चलनविषयक घटक त्याची तीव्रता वाढवितात. म्हणून चलनविषयक साधनांचा वापर करून व्यापारचक्राचे नियंत्रण करता येते. सरकारने मध्यवर्ती बँकेच्या सहकार्याने

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

योग्य प्रकारच्या चलनविषयक धोरणाची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करावी. चलनविषयक धोरण पैशाच्या पुरवठ्याशी संबंधित असते. त्याच्यामार्फत विनाकारण होणारी नोटांची निर्मिती थांबविली जाऊ शकते. तसेच बँक पैशाचे नियंत्रण करण्यासाठी वेगवेगळ्या संख्यात्मक आणि गुणात्मक साधनांचा वापर मध्यवर्ती बँक करते.

संख्यात्मक साधने (Quantitative Measures) : ज्या साधनांमुळे देशातील एकूण पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवता येते त्या साधनांना 'संख्यात्मक साधने' असे म्हणतात. बँकदर, खुल्या बाजारातील व्यवहार व रोख निधी प्रमाणातील बदल इत्यादी साधने संख्यात्मक साधने म्हणून ओळखली जातात.

गुणात्मक साधने (Qualitative Measures) : या साधनांमार्फत कर्जाच्या उपभोगावर नियंत्रण ठेवले जाते. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ज्या क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याची गरज असते त्याला योग्य प्रमाणात कर्ज आणि ज्या क्षेत्राचा कर्जपुरवठा रोखण्याची गरज असते तो गुणात्मक साधनांमुळे रोखला जातो. यामध्ये उपभोग कर्जाचे नियंत्रण, तारण व कर्ज यांमधील अंतर, प्रत्यक्ष कारवाई, नैतिक समजावणी व प्रसिद्धी यांसारख्या साधनांचा समावेश होतो.

व्यापारचक्राच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये वरील साधनांचा योग्य तव्हेने वापर करून व्यापारचक्राचे नियंत्रण केले जाते.

1. मंदीच्या काळातील चलनविषयक धोरण (Cheap Monetary Policy) : मंदीच्या काळात किमती, उत्पन्न, उत्पादन व रोजगार हे सर्व घटक किमान पातळीला पोहोचलेले

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

असतात. सर्वत्र अनिश्चित आणि निराशाजनक वातावरण निर्माण झालेले असते. भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी झालेली असते. त्यामुळे खाजगी गुंतवणूक खर्चात खूप घट होते. तसेच मंदीच्या अवस्थेत रोखता अभिलाषा बरीच जास्त असून व्याजदर किमान पातळीला पोहोचलेला असतो. त्यामुळे नैसर्गिकपणे अर्थव्यवस्थेला मंदीच्या मगरमिठीतून बाहेर काढता येत नाही. म्हणून चलनविषयक धोरणांच्या विविध साधनांचा उपयोग करून खाजगी गुंतवणुकीला चालना द्यावी असा उपाय केन्सने सुचविला आहे.

व्यापारचक्रे मंदीच्या काळात मध्यवर्ती बँक संख्यात्मक साधनांमध्ये पुढीलप्रमाणे बदल करते.

(i) बँकदर (Bank Rate) : मंदीच्या काळात मध्यवर्ती बँक बँकदरात घट करते. त्यामुळे व्यापारी बँकांना आपल्या हुंड्या कमी दराने मध्यवर्ती बँकेकडून वटविता येतात किंवा व्यापारी बँकांना स्वस्त दराने कर्जपुरवठा होतो. त्यामुळे व्यापारी बँका कमी दराने ग्राहकांना कर्जपुरवठा करतात. गुंतवणूकदार गुंतवणुकीसाठी व्यापारी बँकांकडून अधिक कर्ज घेतील व अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक पातळी वाढेल. त्यामुळे किंमतपातळीतील वाढीला चालना मिळून अर्थव्यवस्थेत पुनरुज्जीवन घडून येण्यास मदत होईल.

(ii) खुल्या बाजारातील व्यवहार (Open Market Operation) : खुल्या बाजारातील व्यवहार म्हणजे मध्यवर्ती बँकेमार्फत खुल्या बाजारात सरकारी कर्जरोख्यांची खरेदी-विक्री करणे होय. मंदीच्या काळात मध्यवर्ती बँक खुल्या बाजारात कर्जरोख्याची खरेदी करते. त्यामुळे बँकांकडून कर्जनिधीच्या प्रमाणात वाढ होते किंवा रोख पैशाच्या संख्येत वाढ होते. हा पैसा व्यापारी बँका तसाच ठेवत नाहीत तर ग्राहकांना कर्ज देण्यासाठी वापरतात.

त्यामुळे ग्राहकांना बँकांकडून अधिक कर्जे मिळाल्याने ते त्याचा उपयोग वस्तूंच्या खरेदीसाठी किंवा गुंतवणुकीसाठी करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील मागणी वाढते, किमती वाढतात आणि विस्तार अवस्थेला चालना मिळते.

(iii) रोख निधी प्रमाणातील बदल (Change in Cash Reserve Ratio) : सर्व व्यापारी बँकांना आपल्याकडील ठेवीपैकी ठरावीक प्रमाणात रोख रक्कम मध्यवर्ती बँकेकडे ठेवावी लागते. या प्रमाणात मध्यवर्ती बँक बदल करू शकते किंवा तो अधिकार मध्यवर्ती बँकेला असतो. व्यापारचक्राच्या मंदीच्या काळात या प्रमाणात घट केली जाते. त्यामुळे व्यापारी बँकांकडे अधिक रकमा राहतात. व्यापारी बँका त्यांचा उपयोग कर्जपुरवठा करण्यासाठी करतात. व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीत वाढ होऊन विस्तार अवस्थेला चालना मिळते.

वरील संख्यात्मक साधनांचा संपूर्ण अर्थव्यवस्थेवर सारखाच प्रभाव पडतो. परंतु काही वेळेस विभेदात्मक परिणामाची आवश्यकता असते. तेव्हा व्यापारी बँका काही गुणात्मक साधनांचा वापर करून अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असतात.

2.तेजीच्या काळातील चलनविषयक धोरण (Tight Monetary Policy) : मंदीच्या काळातील परिस्थितीच्या विरुद्ध परिस्थिती तेजीच्या काळात असते. त्यामुळे तेजीच्या काळातील चलनविषयक धोरण मंदीच्या काळातील धोरणाच्या विरुद्ध असते. त्याचे थोडक्यात वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल,

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(i) बँकदरात वाढ : तेजीच्या काळात बँकदरात वाढ करून मध्यवर्ती बँक व्यापारी पतपुरवठा महाग करीत असते. त्यामुळे बँकांना ग्राहकांच्या कर्जावरील व्याजदरात वाढ करणे भाग पडते. ग्राहकांची कर्जाची मागणी कमी होते. व्यापारी बँकांची पतनिर्मिती कमी होऊन अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक पातळी घटते. त्यामुळे तेजीचे नियंत्रण होण्यास मदत बँकांना होते.

(ii) खुल्या बाजारातील व्यवहार : तेजीच्या काळात मध्यवर्ती बँक रोख्यांची विक्री करते. व्यापारी बँका रोखे खरेदी करतात. त्यांच्याकडील अतिरिक्त पैसा सरकारी रोख्यांमध्ये गुंतला जातो. त्यामुळे त्या ग्राहकांना व्यवसायासाठी पूर्वीप्रमाणे कर्जपुरवठा करू शकत नाहीत. साहजिकच, त्यामुळे तेजीचे नियंत्रण होण्यास मदत होते.

(iii) रोख निधी प्रमाणात वाढ : मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या रोख निधीच्या ठेवींशी असलेल्या प्रमाणात वाढ करते. त्यामुळे बँकांना अधिक पैसा मध्यवर्ती बँकेकडे जमा करावा लागतो. साहजिकच, बँकांकडील कर्जपुरवठ्यासाठी लागणारा पैसा कमी होतो. त्यामुळे ग्राहकांना कमी कर्जपुरवठा होतो. बँक-पैशाचे प्रमाण कमी होते व अर्थव्यवस्थेतील तेजी कमी करण्यास मदत होते.

वरील संख्यात्मक साधनांशिवाय मध्यवर्ती बँक काही गुणात्मक साधनांचा वापर करून तेजीची अवस्था नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते.

HRM BUS. ECONOMICS SYBCOM

राजकोषीय साधन/धोरण (Fiscal Measures/Policy)

व्यापारचक्राच्या नियंत्रणासाठी एकट्या चलनविषयक धोरणाचा उपयोग होत नाही, ते अपूर्ण पडते. त्यामुळे चलनविषयक धोरणाबरोबर साहाय्यक म्हणून राजकोषीय धोरणाचा वापर करावा असे सुचविले जाते. त्यामुळे व्यापारचक्र नियंत्रणाचे अपेक्षित परिणाम दिसून येतात. व्यावसायिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी अल्वीन हॅन्सेन (Alvin Hansen) आणि इतर केन्सवादी अर्थशास्त्रज्ञ भरपाईपूरक राजकोषीय (Compensatory Fiscal Policy)) धोरणाचा वापर करावा असे सुचवितात.

सरकारच्या कार्यांमध्ये बराच विस्तार झालेला असल्याने सरकार अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पादनपातळीवर परिणाम करू शकते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील खाजगी व्यावसायिक चक्रात्मक बदल रोखण्याच्या दृष्टीने सरकारने आपल्या कार्यांमध्ये बदल करावेत. राजकोषीय धोरणाची तीन प्रमुख साधने आहेत :

(1) करारोपण (Taxation)

(2) सार्वजनिक खर्च (Public Expenditure)

(3) सार्वजनिक देणी (Public Borrowing).

1. मंदीच्या काळातील राजकोषीय धोरण : अर्थव्यवस्थेत मंदीची चिन्हे दिसायला लागली की, सरकारने एकत्रितपणे तीनही साधनांचा वापर करून स्थैर्य निर्माण करावे. मंदीच्या काळात सरकारने कोणतेही नवीन कर लादू नयेत. तसेच जुने काही कर परिणामकारकपणे

कमी करावेत. त्यामुळे लोकांच्या हातात अधिक खरेदीशक्ती शिल्लक राहते. त्या खरेदीशक्तीचा वापर लोक वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी करतील. तसेच त्याच वेळेस सरकारने व्यावसायिक कृतिकार्यक्रमामध्ये वाढ करून अधिक खर्च करावा. सरकारने सार्वजनिक बांधकामावर अधिक खर्च करून रोजगार वाढवावा. सरकारने सार्वजनिक खर्चाच्या अनेक योजना तयार ठेवाव्यात. उदा., कालवे, धरणे, रस्ते, बगिचे, शाळा व दवाखाने इत्यादी. मंदीची चिन्हे किंवा लक्षणे दिसायला लागली की लगेच त्यांची अंमलबजावणी करावी. या कामामुळे बेरोजगारांना रोजगार मिळून त्यांच्या खरेदीशक्तीत वाढ होते. त्यामुळे परिणमाकारक मागणीत व व्यापारी व्यवहारात होणारी घट थांबविली जाते. या कामासाठी लागणारा खर्च सरकारने नवीन नोटा छापून किंवा बँकांकडून कर्जउभारणी करून करावा.

मंदीच्या काळात सरकारने तुटीच्या अंदाजपत्रकाचे धोरण स्वीकारावे आणि अर्थव्यवस्थेतील पैशाचा प्रवाह वाढवावा. तुटीच्या अंदाजपत्रकीय धोरणामुळे अर्थव्यवस्थेत नवीन खरेदीशक्ती प्रवेश करते आणि तिचा उपयोग मंदी व बेरोजगारीविरुद्ध लढण्यासाठी होतो.

सार्वजनिक कर्जउभारणी या साधनांचादेखील मंदीविरुद्ध वापर करावा. सार्वजनिक कामे सुरू करण्याच्या धोरणामुळे अंदाजपत्रकात निर्माण होणारी तूट सरकारने काही प्रमाणात कर्जे उभारून भागवावी.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

समाजाच्या ज्या घटकांकडे पैसा पडून आहे त्यांच्याकडून कर्जउभारणी करावी. म्हणजे अर्थव्यवस्थेतील निष्क्रिय निधी उत्पादक कामामध्ये लावला जाईल.

2. तेजीच्या काळातील राजकोषीय धोरण : अर्थव्यवस्थेत जेव्हा तेजीची अवस्था असते तेव्हा सरकारने मंदीच्या काळात स्वीकारलेल्या धोरणाबरोबर विरुद्ध धोरण स्वीकारावे. खाजगी खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने पूर्वीच्या कराचे दर तर वाढवावेतच; परंतु त्याचबरोबर नवीन करही लादावेत.

सरकारने सार्वजनिक बांधकामे व त्यासारख्या इतर कामांवरील खर्च कमी करावा. काही पतचलन सरकारने मागे घ्यावे. त्याचबरोबर बँकांच्या कर्जाची परतफेड करावी. त्यामुळे चलनातील पैशाची संख्या कमी होईल. यामागची कल्पना म्हणजे सरकारने तेजीच्या काळात आधिक्याचे अंदाजपत्रक धोरण स्वीकारावे.

असे आढळून आले आहे की, जर सरकारने भरपाईपूरक खर्चाचे राजकोषीय धोरण (Compensatory Fiscal Policy) स्वीकारल्यास अर्थव्यवस्थेत पैशाच्या गरजेनुसार पुरवठा राहून आर्थिक स्थैर्य राखले जाते.

अंगभूत व ऐच्छिक स्थिरके/उपाय (Automatic Stabilizers and Discretionary Stabilizers) : वर वर्णन केलेली चलनविषयक व राजकोषीय साधने सरकारच्या ऐच्छिकतेनुसार वापरली जातात. त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सरकारने खूपच दक्ष राहणे व त्यांचा योग्य वेळेस वापर करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सरकारने योग्य करविषयक, चलनविषयक आणि खर्चविषयक धोरणांचा स्वीकार करून त्यांचा वेळेवर वापर करण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी बदलानुसार दक्षता व तत्परता दाखविण्याचीसुद्धा गरज आहे. परंतु वरील साधनांचा आपोआप असा उपयोग होईल का, या बाबतीत शंका आहे. म्हणून अर्थशास्त्रज्ञ व्यापारचक्राचे नियंत्रण करण्यासाठी अनेक अंगभूत स्थिरकांचा (Built in Stabilisers) उपयोग करण्याचे सुचवितात. अंगभूत स्थिरके हे आर्थिक धक्काशोषक (Shock Absorber) असतात. त्यांची परिस्थितीनुसार आपोआप अंमलबजावणी होत असते. त्यासाठी सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज नसते. अंगभूत स्वीकाराचे महत्त्वाचे साधन म्हणजे प्रगतिशील उत्पन्न कर होय. प्रगतिशील उत्पन्न कराच्या बाबतीत कमी उत्पन्नधारक लोकांना कमी दराने कर व अधिक उत्पन्नधारक लोकांना अधिक दराने कर भरावा लागतो. जेव्हा तेजीची अवस्था असते आणि लोकांच्या उत्पन्नात वाढ होते तेव्हा या लोकांना आपोआपच अधिक दराने कर भरावा लागतो. त्यामुळे त्यांच्या क्रयशक्तीत घट होऊन त्यांची वस्तू व सेवांची मागणी कमी होते आणि तेजीचे नियंत्रण करण्यास मदत होते. तसेच जेव्हा मंदीची अवस्था असते तेव्हा लोकांचे उत्पन्न कमी होते. म्हणून त्यांना कमी दराने कर भरावे लागतात. त्यामुळे त्यांच्या हातात अधिक क्रयशक्ती शिल्लक राहते. त्यामुळे मंदीची अवस्था नियंत्रित होण्यास मदत होते.

बेरोजगार विमा योजना हे देखील अमेरिकेत अंगभूत स्थिरके म्हणून वापरले जाते. या योजनांची कार्यवाहीदेखील तेजी-मंदीच्या परिस्थितीनुसार होत असते. मंदीच्या काळात बेकारी वाढते. त्यामुळे बेकार लोकांना बेकारी विमा योजनेचा लाभ मिळून त्यांच्या हातात खरेदीशक्ती येते. त्यामुळे मंदीचे नियंत्रण होण्यास मदत मिळते. तसेच

तेजीच्या काळात बेकारीचे प्रमाण कमी होते. बेकारी विमा योजनेचे फायदे मिळण्याचे आपोआप थांबते आणि तेजीच्या नियंत्रणास आपोआप मदत मिळते.

व्यापारचक्राच्या स्थितीनुसार अंगभूत स्थिरकांची आपोआप त्वरित अंमलबजावणी होते. त्यामुळे ते जाणीवपूर्वक वापरण्यात येणाऱ्या साधनांपेक्षा चांगली आहेत. जाणीवपूर्वक साधनांचा वापर विलंबाने होत असतो. त्यामुळे त्यांचा परिणाम तुलनेने कमी असतो.

इतर साधने/धोरण (Other Measures/Policy)

आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी चलनविषयक व राजकोषीय साधनांचा उपयोग केला जात असतो. पूर्ण रोजगार व आर्थिक विकास ही उद्दिष्टे केवळ या साधनांमार्फत साध्य करता येत नाहीत. त्यासाठी काही इतर साधनांचा वापर करावा लागतो. ही साधने वेगवेगळया देशांमध्ये वेगवेगळी असतात. त्यांचा वापर देशाची आर्थिक स्थिती व विकासाची पातळी यांवर अवलंबून असतो. काही प्रमुख इतर साधने पुढीलप्रमाणे आहेत.

1. उत्पन्न धोरण (Income Policy) : केन्सप्रणीत चलनविषयक दृष्टिकोनावर केन्सनंतरच्या अर्थशास्त्रज्ञांनी आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, चलनविस्तारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पैसाविषयक किंवा राजकोषीय साधने अधिक परिणमाकारक ठरत नाहीत तर उत्पन्नविषयक धोरण अधिक परिणामकारक ठरत असते. हे धोरण अलीकडच्या काळात अधिक प्रमाणात वापरले जात आहे. विकसित देशांमध्ये मागणी-ओढनिर्मित व खर्च-दाब

चलनविस्ताराचे नियंत्रण करण्यासाठी उत्पन्न धोरणाचा वापर केला जात आहे. एकूण पुरवठ्यावरील एकूण मागणीचा भार किंवा आधिक्य कमी करण्यासाठी उत्पन्नविषयक धोरणानुसार खाजगी उपभोग खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला जात असतो. एकूण प्रभावी मागणीमध्ये खाजगी उपभोग खर्चाचे प्रमाण अधिक असते.

वाढता औद्योगिक रोजगार, कामगार. संघटनशक्ती, सामूहिक सौदाशक्ती, वाढते औद्योगिक प्रकल्प यावरच उत्पन्नाचे प्रमाण व किंमतपातळी अवलंबून असते. म्हणून या विविध घटकांमार्फत उत्पन्नात अपेक्षित बदल करता येतो आणि त्या अनुषंगाने अर्थव्यवस्थेत स्थैर्य निर्माण करता येते. काही देशांमध्ये व्यवहारतोनातील असमतोल दूर करण्यासाठी अवमूल्यन व चलनसंकोच धोरणापेक्षा उत्पन्न धोरणाचाच अधिक वापर केला जात आहे. उत्पन्नविषयक धोरणाचा सर्वप्रथम वापर इंग्लंडमध्ये करण्यात आला. परंतु या धोरणास मर्यादित यश मिळाले होते. कारण त्या वेळेस अनुदाने, किंमत नियंत्रणे, शिधावाटप पद्धती व सक्तीची बचत योजना यांसारख्या इतर साधनांचा वापर केला गेला होता. त्यामुळे देशात दडलेल्या चलनविस्ताराची स्थिती निर्माण झाली होती.

उत्पन्न धोरणाचा वापर करण्यात अनेक अडचणी आहेत. उत्पन्न धोरणाचा अल्पकाळातच प्रभाव दिसतो. दीर्घकाळात त्याच्या कार्यवाहीत व परिणामकारकतेत अडचणी निर्माण होतात. प्रा. आर. पी. लिप्से यांच्या मते, जर अर्थव्यवस्थेत दोन टक्क्यांपेक्षा अधिक बेरोजगारी असेल तर उत्पन्न धोरण उपयुक्त ठरत नाही. भारतासारख्या देशात उत्पन्नाचे असमान वाटप झालेले असल्याने उत्पन्न धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी करता येत नाही. भारतात अनेक लोकांचे उत्पन्न खूप कमी

आहे. त्यांच्याकडून कोणत्याच प्रकारची बचत होत नाही. अशा स्थितीत चलनविस्ताराचे नियंत्रण करण्यासाठी उत्पन्न धोरण अप्रभावी ठरते. जर आपणास किंमतस्थैर्य निर्माण करावयाचे असेल तर वेतन व बिगर-वेतनाच्या स्वरूपातील पैशातील उत्पन्न नियंत्रित केले पाहिजे तर आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होते.

2.**वेतन समायोजन धोरण (Wage Adjustment Policy) :** आर्थिक स्थिरीकरणाचे हे महत्त्वाचे धोरण आहे. अर्थव्यवस्थेत जर मंदीची स्थिती असेल तर तिच्या निवारणासाठी वेतनात वाढ करावी. त्यामुळे श्रमिकांचे उत्पन्न वाढेल, त्यांचा उपभोगावरील खर्च वाढेल, उपभोग्य वस्तूंच्या किमती वाढतील, गुंतवणुकीत वाढ होईल आणि अर्थव्यवस्थेला मंदीत बाहेर काढण्यासाठी मदत होईल.

याउलट, तेजीच्या काळात वेतनदरात घट करून श्रमिकांच्या हातातील खरेदीशक्ती कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. वस्तूची मागणी कमी होते. किमती घटतात व तेजीचे नियंत्रण होते.

आर्थिक स्थैर्यासाठी योग्य वेतन धोरणाचा वापर करावा लागतो. कारण मजुरीचे दुहेरी स्वरूप असते. एका बाजूने मजुरी म्हणजे कामगाराचे उत्पन्न असते तर दुसऱ्या बाजूने उत्पादकाचा खर्च असतो. श्रमिकांची उपभोग प्रवृत्ती उत्पादकापेक्षा जास्त असते. त्यामुळे प्रभावी मागणीत कामगारांचा वाटा अधिक असतो. म्हणून वेतन धोरणामार्फत प्रभावी मागणी आणि प्रभाव मागणीमार्फत किंमतपातळी असा बदल घडवून आणता येणे शक्य

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

आहे. परंतु वेतनदराची श्रमिकांच्या उत्पादकतेशी सांगड घातली पाहिजे. त्यामुळे आर्थिक स्थैर्यासाठी वेतन धोरण अधिक उपयुक्त होईल.

3. किंमत समायोजन धोरण (Price Adjustment Policy) : किंमतपातळीतील चक्रीय बदलामुळे व्यापारचक्रीय बदल घडून येत असतात असे काही अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. त्यामुळे किंमत समायोजन धोरणामार्फत आर्थिक स्थैर्य निर्माण करणे शक्य आहे.
तेजीच्या काळात अनेक प्रकारच्या नियंत्रणाचा वापर केला जात असतो. प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील. (अ) उपभोग्य वस्तूंचे नियंत्रित वाटप (ब) वस्तूंच्या हप्तेबंदी खरेदी पद्धतीवरील नियंत्रणे (क) किंमत नियंत्रणे (ड) बांधकाम परवान्यावरील नियंत्रण (इ) औद्योगिक परवान्यावरील नियंत्रणे (ई) चलनवाढीवरील नियंत्रणे.

या सर्वच नियंत्रणाचा वापर करता येणे शक्य नसते. प्रा. आयर्विन फिशर यांनी चलनविस्ताराचे नियंत्रण करण्यासाठी किंमत नियंत्रणाचा वापर करण्याचे सुचविले आहे. किंमत नियंत्रणामध्ये किंमतवाढीची महत्तम पातळी ठरविली जाते. त्यापेक्षा किमती वाढणार नाहीत याची दक्षता घेतली जाते. परंतु विकसनशील देशामध्ये वस्तूंचा काळाबाजार आणि भ्रष्टाचार यांसारखे प्रकार निर्माण होतात. म्हणून किंमत नियंत्रण पद्धतीला अपयश येते.

प्रा. कुरीहारा यांच्या मते, अनेक प्रशासकीय अडचणींमुळे किंमत नियंत्रण पद्धतीचा प्रभावी वापर करता येत नाही. म्हणून ते ज्या वस्तूंचा पुरवठा मर्यादित आहे त्याच्या बाबतीत नियंत्रित वाटप पद्धतीचा स्वीकार करण्याचे सुचवितात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

मंदीच्या काळात किंमतघटीला प्रतिबंध व्हावा म्हणून सरकार काही वस्तूंच्या आधारभूत किमती (Support Prices) जाहीर करते. या किमतीपेक्षा जर किमतीमध्ये अधिक घट होत असेल तर आधारभूत किमतीला सरकार स्वतः या वस्तूची खरेदी करते. हे धोरण शेतीमालाच्या बाबतीत अधिक प्रभावी होत असते.

4.श्रमबाजाराचे संघटन (Organisation of Labour Market) : अर्थव्यवस्थेत बऱ्याचदा श्रमिक पुरवठा असतो आणि त्याचबरोबर त्यांना मागणीही असते. परंतु त्याच वेळेला बेकारीचे अस्तित्व असते. या विरोधाभासात्मक परिस्थितीचे महत्त्वाचे कारण म्हणजे श्रम मागणी-पुरवठ्याच्या माहितीचा अभाव. म्हणून विकसनशील देशांमध्ये श्रमबाजार संघटन करण्याची आवश्यकता आहे. श्रमाच्या मागणी-पुरवठ्यात समन्वय निर्माण करण्याची गरज आहे. रोजगार विनिमय केंद्रामार्फत रोजगार संधीची माहिती पुरविणे व त्यांच्यामार्फतच कामगार भरती करणे. देशात रोजगार संधीच्या स्वरूपानुसार कामगार प्रशिक्षण व पुनर्प्रशिक्षण कार्यक्रम राबविले गेले पाहिजेत. त्यामुळे देशातील बेकारी कमी करून मंदीला आळा घालता येईल.

5. अंगभूत स्थिरके (Built in Stabilizers) : राजकोषीय धोरणांच्या विश्लेषणात आपण अंगभूत स्थिरकांचा विचार केलाच आहे. काही करांचा वापर अंगभूत स्थिरके म्हणून करता येतो. यामध्ये वैयक्तिक उत्पन्न कर व निगम कर महत्त्वाचे कर आहेत. कारण याचे दर प्रगतिशील आहेत. तेजीच्या काळात लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. परंतु या कराच्या दरात वाढ होत असल्याने लोकांची खरेदीशक्ती काही प्रमाणात आटोक्यात राहते आणि तेजीचे

नियंत्रण होण्यास मदत होते. याउलट, मंदीच्या काळात लोकांचे उत्पन्न घटत असल्याने त्यांना कमी दराने कर भरावा लागतो. म्हणून त्याची क्रयशक्ती वाढते व किंमतघटीला आळा बसतो. हे परिणाम आपोआप होत असतात. म्हणून त्यांना अंगभूत स्थिरके असे म्हणतात.

बेरोजगार विमा योजनादेखील (Unemployment Insurance Scheme) अंगभूत स्थिरकामध्ये समाविष्ट होते. मंदीच्या काळात बेकारीचे प्रमाण वाढते. त्यामुळे अनेक प्रमिकांना या योजनेचा लाभ होतो. त्यामुळे त्याच्या हातात अधिक वग्दीशक्ती येऊन किंमतघटीला म्हणजेच मंदीला आळा बसतो. याउलट, तेजीच्या काळात बेकारी कमी होते. बेरोजगार विम्याचे फायदे मिळण्याचे बंद होते. परंतु त्याचबरोबर कामगारांना बेरोजगार विम्याचे हप्ते भरावे लागतात. त्यामुळे कामगारांची खरेदीशक्ती कमी होऊन तेजीला आळा बसण्यास मदत होते. शेतीमालाच्या आधारभूत किमती जाहीर करणे हे देखील अंगभूत स्थिरकांतर्गत येते.

6: आंतरराष्ट्रीय सहकार्य (International Co-operation) : व्यापारचक्राच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना व्यापारचक्राचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असते असे आपण पाहिले आहे. एखाद्या देशात व्यापारचक्रीय बढत निर्माण होत असतील तर आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे इतर देशांमध्ये संक्रमित होत असतात. म्हणून देशा-देशांमध्ये सहकार्य प्रस्थापित करून व्यापारचक्राचे नियंत्रण करता येते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रा. कुरीहारा यांच्या मते, आज देश अधिक जागरूक बनले आहेत. एकूण मागणीतील कामगारांची समस्या ही आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे. बहुराष्ट्रीय चलनविषयक व व्यापारी सहकार्य जागतिक समृद्धीसाठी आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी जागतिक बँक व संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतर संस्था यांच्यामार्फत चलनविषयक सहकार्य निर्माण करून व्यापारचक्रीय बदलांना प्रतिबंध घातला जात आहे.

स्वाध्याय

(अ) रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय वापरून विधाने पूर्ण करा.

1. सर्वच व्यापारचक्रांच्या अवस्थांचा क्रम------------ असतो. (सारखाच/वेगवेगळा)

2. . व्यापारचक्राच्या अवस्थांमध्ये किंमतपातळी व रोजगारपातळी ----------दिशेने बदलतात. (एकाच/भिन्न-भिन्न)

3.व्यापारचक्राच्या अवस्थांचा कालावधी ------------असतो.
(समान/भिन्न-भिन्न)

4.व्यापारचक्राच्या विस्तार अवस्थेत रोजगार पातळीत .---------होते. (वाढ/घट)

5.सरकारी खर्चातील बदल हे एक------------ साधन आहे.

(राजकोषीय/चलनी)

6. . मंदीवर नियंत्रण मिळविण्यासाठी करामध्ये--------- केली जाते. (वाढ/घट)

7. मंदीकडून तेजीकडे होणारे बदल हे ----------असतात. (जलद/हळूहळू)

8. तेजीचे शिखर अधिक---------------- असते. (पसरट/तीक्ष्ण) . .

HRM BUS ECONOMICS SYBCOM

संदर्भसूची

2.व्यवसायिक अर्थशास्त्र (समग्रलक्षी)पब्लिकेशन प्रा. डॉ.राजेंद्र अ.रसाळ जून 2020.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM